प्रेसनोट-

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग व जिल्हा पाणी स्वच्छता मिशन कक्ष यांच्या वतीने दिनांक 22ऑक्टोबर 2018 ते दिनांक 5 नोव्हेंबर 2018 खुल्यास्तरावर "प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर मॉडेल तयार करणे" स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा स्पर्धा 18 वर्षाखालील गट व 18 वर्षावरील अशा दोन गटात घेण्यात येणार आहेत. अशी माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्रीम. के. मंजुलक्ष्मी यांनी दिली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा पहिला हागणदारी मुक्त जिल्हा तसेच भारतातील पहिला स्वच्छ जिल्हा म्हणुन नामांकण प्राप्त झाले आहे. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यात ODF+ कडे वाटचाल सुरु आहे. प्लास्टीक कचरा हा जिल्हावासियांना समोर मोठी समस्या आहे. या कच-याचे योग्य व्यवस्थापन व्हावे तसेच निर्माण होणा-या प्लास्टिक कच-याचा पुर्नवापर व्हावा या हेतुने जिल्हा परिषद सिंधुदुर्ग व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांच्या वतीने नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणुन खुल्यास्तरावर "प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर मॉडेल तयार करणे" स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

"प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर मॉडेल तयार करणे" या स्पर्धा खुल्या असुन दोन स्तरावर घेण्यात येणार असुन या स्पर्धा 18 वर्षाखालील गट व 18 वर्षावरील अशा दोन गटात घेण्यात येणार आहे. 18 वर्षाखालील गटास बक्षिस रक्कम अनुक्रमे प्रथम क्रमांक रक्कम रुपये 7000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, व्दितीय क्रमांक रक्कम रुपये 5000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह व तृतिय क्रमांक रक्कम रुपये 3000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तर 18 वर्षावरील गटास बक्षिस रक्कम अनुक्रमे प्रथम क्रमांक रक्कम रुपये 10000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, व्दितीय क्रमांक रक्कम रुपये 7000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तर तृतीय क्रमांक रक्कम रुपये 5000/- प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

खुल्यास्तरीय "प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर मॉडेल तयार करणे" या स्पर्धेकरीता पुढील प्रमाणे अटी व शर्ती ठेवण्यात आल्या आहेत. स्पर्धेत सहभागी होण्याकरीता स्पर्धकांने ओळखपत्र व वयाचा पुरावा देणे बंधनकारक आहे. तसेच प्लास्टिक पुनर्वापर मॉडेल सादर करताना सदर मॉडेल दैनंदिन वापरात येणे गरजेचे आहे. स्पर्धकांने सादर केलेले मॉडेल हे स्पर्धकांचे स्वत:चे असावे. स्पर्धकांने सादर केलेला मॉडेलवर आक्षेप आल्यास सर्वस्वी स्पर्धक जबाबदार असेल.स्पर्धकाने सादर केलेल्या प्लास्टीक पुनर्वापर मॉडेल सोबत त्याचा कसा वापर होणार व तयार करण्याची पध्दत यांची माहिती लिखित स्वरुपात मॉडेल समवेत सादर करावी. प्लास्टीक पुनर्वापर स्पर्धेच्या परिक्षणा दरम्यान स्पर्धकांने आपण तयार केलेल्या मॉडेलबाबत संपुर्ण माहीती परिक्षकांना उपस्थित राहुन द्यावयाची आहे. सदर स्पर्धेत कोणतेही बदल करणे किंवा रद्द करणेबाबत सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:कडे राखुन ठेवले आहेत.

खुल्यास्तरीय "प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर मॉडेल तयार करणे" या स्पर्धेचे आयोजन दिनांक 22 ऑक्टोबर 2018 ते दिनांक 5 नोव्हेंबर 2018 खुल्यास्तरावर या कालावधीत करण्यात येणार आहे. तरी स्पर्धकांनी आपली नावनोंदणी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग दुरध्वनी क्रमांक 02362/228246 करावयाची आहे. स्पर्धकांनी प्लास्टीक पुनर्वापर या विषयावर तयार केलेले मॉडेल दिनांक 5 नोव्हेंबर 2018 पर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग जमा करावयाचे आहे. प्लास्टीक पुनर्वापर स्पर्धेच्या परिक्षणा दरम्यान स्पर्धकांने आपण तयार केलेल्या मॉडेलबाबत संपुर्ण माहीती परिक्षकांना उपस्थित राहुन द्यावयाची आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग